Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – V September - October 2021

# के जे मेहता हायस्कूल व इ वाय ज्युनिअर कॉलेज नासिक रोड नासिक माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा अवांतर वाचन सवयींचा अभ्यास

डॉ. सूर्यवंशी वैशाली पुंजाराम
*प्राचार्य,*
*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

- **प्रस्तावना :-**

अठराव्या व एकोणिसाव्या शतकापर्यंत वाचकांचा स्वतंत्र असा वर्ग नव्हता. वाचन संस्कृतीच्या कक्षा ज्याप्रमाणात रुंदावायला हव्या होत्या त्या प्रमाणात त्या रुंदावल्या गेल्या नाहीत. एकोणिसाव्या शतकामध्ये इंग्रजांचे राज्य असल्यामुळे इंग्रजी साहित्याचे अवांतर वाचन अनेक जण करून लागले. त्यातूनच भारतीयांना इंग्रजांची सत्ता झुगारून लावण्याची व 'स्व' विषयीची जाणीव निर्माण झाली.

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

- **वाचनाचा अर्थ :-**

"वाचन हा शब्द वच म्हणजेच बोलणे या संस्कृत धातू पासून झालेला आहे. वच म्हणजे बोलणे या शब्दाचे कर्तरी रुप वाचन. वाचन म्हणजे बोलणे, बोलते करणे अक्षरे, शब्द हे स्वभावन: मुक असतात शब्दांना जो बोलायला लावतो तो खरा वाचक."

"अक्षर उच्चारणे किंवा पठण करणे याला वाचन असे म्हटले जाते."

डॉ. शं. कृ. सोहनी – 'वाचन म्हणजे लिखित संकेतांचा अर्थ पूर्ण अवबोध यात शब्दांची प्रत्यभिज्ञा, प्रवाह, आकलन इत्यादी समावेश होतो तर वाचन कौशल्यात शब्द ज्ञान, आकलन किंवा अर्थ ग्रहण व अस्खलित वाचन यांचा समावेश होतो.

वाचनाचे महत्व अनेक शिक्षणतज्ञ व ज्ञानी व्यक्तींनी सांगितले आहे डॉ. घळसासी म्हणतात "पुस्तक प्रेमी मनुष्य अत्यंत सुखी व श्रीमंत असतो पुस्तके नवी माहिती व ज्ञान देतात तरुणांना योग्य मार्गदर्शन दाखवून वृध्दांना दिलासा देतात.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा आवांतर वाचनाविषयी जीवनातील महत्त्व सांगितलेले आहे.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण – "मला वाचनाची आवड अगदी लहानपणापासूनच आहे विविध पुस्तकांचे वाचन करावे हा छंद मला सुरुवातीपासूनच लागला. माझा दृष्टिकोन विशाल व व्यापक करण्याचे कार्य या पुस्तकांनीच केले माझ्यासाठी भव्य स्वप्नांची सृष्टी निर्माण करण्याचे कार्य या पुस्तकांनीच केले. मला ही पुस्तके माझे मार्गदर्शक

व विश्वासू मित्राप्रमाणे वाटतात. ग्रंथांच्या सहवासात वेळ कसा निघून जातो हेच कळत नाही.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वडील रामजी आंबेडकर हे तर स्वतः उपाशीपोटी राहून आपल्या मुलाला वाचनासाठी पुस्तके आणून देत होते.

**संशोधनाची गरज :-**

शिक्षक वर्ग अध्यापन करत असतात त्यावेळी भाषा विषयातील नवीन शब्द स्पष्ट करताना किंवा इतिहास, भूगोल यातील नवीन संबोध स्पष्ट करताना किंवा विज्ञानातील संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगताना शिक्षकाला स्पष्टीकरण द्यावे लागते वेगवेगळी उदाहरणे व दाखले देऊन विशिष्ट नवीन शब्द नवीन संबोध विद्यार्थ्यांना समजवावे लागतात. परंतु शिक्षक हे केव्हा करेल तेव्हा त्यांच्याजवळ हा उदाहरणांचा दाखल्यांचा साठा असेल आणि हा साठा आपल्या जवळ जमा करण्याचे एकमेव साधन म्हणजे अवांतर वाचन.

शिक्षकांनी जर फक्त पाठ्यपुस्तकातील माहिती विद्यार्थ्यांना जशीच्या तशी सांगितली तर त्याचे अध्यापन हे अतिशय रटाळ व कंटाळवाणे होते परंतु आपले अध्यापन प्रभावी करण्यासाठी शिक्षकाचा अवांतर वाचन करणे गरजेचे आहे. अध्यापनात रंजकता, जिवंतपणा आणण्यासाठी शिक्षकांनी स्वतःला अवांतर वाचनाची सवय लावून घ्यायला हवी.

जसे शरीरस्वास्थ्य चांगले राहण्यासाठी व्यायाम किंवा योगासने करण्याची गरज असते तसेच मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी वाचनाची आवश्यकता असते.

माध्यमिक शाळेतील व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक हे अवांतर वाचन करतात व त्या वाचनाचा व आपल्या अध्यापन अध्ययन प्रक्रियेत किती वापर करतात? हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

- **संशोधनाचे महत्त्व :-**

आपल्या विषयाची सखोल व  माहिती व ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षकाला अवांतर वाचन करणे आवश्यक आहे.

शिक्षकीपेशा हा वाचनावर आधारित आहे. वाचनावर शिक्षकाचे अध्यापन किती प्रभावी आहे हे ठरविले जाते. सतत बदलत जाणाऱ्या व अधिकाधिक गुंतागुंतीच्या होणाऱ्या परिस्थितीत मानव वाचनापासून दूर राहू शकत नाही. कोणत्याही भाषेतील अक्षरे, शब्द, वाक्य यांच्या वरून नजर फिरविणे म्हणजे वाचन नसते तर नजरेसमोर दिसणाऱ्या अक्षरांच्या शब्दांच्या व वाक्यांच्या अर्थाचे आकलन होऊन त्यावर स्वतःची प्रतिक्रिया स्वतःशीच नोंदविणे म्हणजे वाचन असते.

आजच्या आधुनिक संगणकीय युगात मनोरंजनाच्या साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे त्यामुळे वाचनाचे प्रमाण कमी झाले आहे. फुरसतीचा वेळ हा वाचना ऐवजी इतर मनोरंजनाच्या साधनांकडे दिला जातो त्यामुळे वाचन संस्कृती कडचा ओघ कमी झालेला आहे.

- **समस्या विधान :-**

के जे मेहता हायस्कूल व इ वाय ज्युनियर कॉलेज नाशिक रोड नाशिक माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अवांतर

वाचन सवयींचा अभ्यास.

- कार्यात्मक व्याख्या :-
  **(नाशिक शहर)** औद्योगिक वसाहत असलेले व प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेले शहर म्हणजे नाशिक शहर.

- **(माध्यमिक शिक्षण शाळेतील शिक्षक)** :-
  प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या स्तरावर अध्यापन करणारे शिक्षक.

- **जुनियर कॉलेज :-** उच्च माध्यमिक चे 11 वी 12 वी चे वर्ग

- **अवांतर वाचन :-**

अवांतर वाचनामध्ये वर्तमानपत्रे, संदर्भ पुस्तके, नियतकालिके, कथा, कादंबऱ्या इत्यादी साहित्य वाचन माध्यमिक शाळेतील शिक्षक करतात याला अवांतर वाचन म्हणतात.

- **उद्दिष्टे :-**

1) के जे मेहता हायस्कुल व इ वाय जुनियर कॉलेज येथील शिक्षकांच्या वाचन सवयींचा अभ्यास करणे.
2) के जे मेहता हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथील शिक्षकांना अवांतर वाचनात येणाऱ्या समस्या जाणून घेणे.
3) भाषा विषय शिक्षक व इतर विषय शिक्षकांच्या अवांतर वाचनाविषयी तुलना करणे.

- **गृहितके :-**

1) प्रत्येक माध्यमिक शाळेत ग्रंथालय असते.
2) अवांतर वाचनासाठी विविध प्रकारची साहित्य प्रकाशित होत असते.
3) अवांतर वाचनाचा अध्यापनासाठी उपयोग होतो.

- **व्यक्ती व मर्यादा :-**

1) प्रस्तुत संशोधनात नाशिक शहरातील के जे मेहता हायस्कूल व ज्युनियर कॉलेज नासिक रोड येथील शाळेपुरतेच मर्यादित आहे.
2) प्रस्तुत संशोधनात केवळ माध्यमिक शिक्षकांच्या अवांतर वाचनाचा अभ्यास केला आहे.

- **मर्यादा :-**

1) शिक्षकांच्या अवांतर वाचनाची सर्वेक्षण केले जाणार आहे परंतु त्यावर कुठलेही उपक्रम राबविले जाणार नाहीत.

- **संशोधनाची कार्यपद्धती :-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने शालेय सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. के जे मेहता हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथील माध्यमिक शिक्षकांच्या अवांतर वाचन सवयींचा अभ्यास केला आहे.

- **नमुना निवड :-**

माध्यमिक शाळेतील भाषा शिक्षक व इतर विषय शिक्षक यांची निवड प्रासंगिक संभाव्यता पद्धतीने केलेली आहे कारण संशोधकाला जे प्रतिसाद सहज उपलब्ध होऊ शकतात अशा शिक्षकांचाच नमुना निवडीत समावेश केलेला आहे. त्या निवडीनुसार प्रश्नावली भरून घेण्यात आली आहे.

- **साधने :-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने शिक्षकांकरिता मुक्त व बद्ध प्रश्न असलेल्या मिश्र प्रश्नावली चा उपयोग केला आहे.

- **माहिती विश्लेषणाची संख्याशास्त्रीय तंत्रे -**

प्रस्तुत संशोधनात माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा उपयोग केला आहे.

- **संशोधनाची कार्यवाही :-**

1) प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात प्रथमता उपलब्ध साहित्य वाचले.
2) मिश्र प्रश्नावली साधन तयार करून शिक्षकांकडून भरून घेतली.
3) शिक्षकांकडून प्रतीसाद घेतला व त्या प्रतिसादाचे शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाद्वारे विश्लेषण केले.
4) मिळालेल्या माहितीवरून विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे.

- **निष्कर्ष :-**

1) रिकाम्या वेळेमध्ये पसंतीचे वाचन या कामाला प्राधान्य देणाऱ्या भाषा शिक्षकांची संख्या इतर विषय शिक्षकांपेक्षा जास्त आहे.
2) भाषा शिक्षक व इतर विषय शिक्षक दररोज वर्तमानपत्र वाचतात.
3) वृत्तपत्रातील ठळक बातम्या हे सदर शिक्षकांना आवडते कारण त्यामुळे ज्ञानवृद्धी होते हे सांगणे सांगणाऱ्या इतर विषय शिक्षकांची संख्या भाषा शिक्षकांपेक्षा जास्त आहे.
4) अवांतर वाचन करणारे भाषा शिक्षक व इतर विषय शिक्षक संख्या समान आहे.
5) अवांतर वाचन ज्ञानात्मक माहितीसाठी करावेसे वाटले हे सांगणारे इतर विषय शिक्षकांची संख्या भाषा शिक्षकांपेक्षा जास्त आहे.
6) अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तकांचा संदर्भ म्हणून उपयोग करणारे इतर विषय शिक्षकांची संख्या भाषा शिक्षकांपेक्षा जास्त आहे.
7) ज्ञानात भर पडावी म्हणून संदर्भ ग्रंथांचा वापर करणारे भाषा शिक्षकांची संख्या इतर विषय शिक्षकांपेक्षा जास्त आहे.

8) मनोरंजनासाठी कादंबरीचे वाचन करणाऱ्या इतर विषय शिक्षकांची संख्या भाषा शिक्षकांपेक्षा जास्त आहे.
9) भाषा व इतर विषय शिक्षकांचे स्वतःचे ग्रंथ संग्रहालयात आहे त्यात त्यांच्या आवडीची पुस्तके असून त्यांना हवी असलेली पुस्तके ते शाळेच्या ग्रंथालयात मिळवतात.
10) भाषा व इतर विषय शिक्षक वाचनासाठी दिवसाला एक ते दोन तास देतात व त्यांना हवे असलेले पुस्तक मिळाल्यानंतर ते दोन ते तीन दिवसात वाचतात.
11) भाषा शिक्षक व इतर विषय शिक्षक पुस्तकांची चर्चा सहकाऱ्यांबरोबर करतात व त्यांना हवी असलेली पुस्तके देतात. त्याचप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांना अवांतर वाचन सवयी वाढविण्यासाठी ग्रंथालयातील पुस्तके सुचवितात.
12) भाषा शिक्षक व इतर विषय शिक्षक अध्यापन करताना अभ्यासक्रमावर आधारित पुस्तके वाचतात त्याचप्रमाणे अवांतर वाचनातून त्यांना ज्ञानात्मक सर्वसामान्य माहिती मिळते तसेच मनोरंजनासाठी ते मराठी कादंबरी वाचतात.
13) भाषा शिक्षक व इतर विषय शिक्षकांना पद्य वांग्मय प्रकारातील कविता व गद्य वांग्मय प्रकारातील कादंबरी हा वांग्मय प्रकार वाचायला आवडतो त्याचप्रमाणे अध्यात्मिक वृत्ती वाढविण्यासाठी ते धार्मिक ग्रंथांचे वाचन करतात.

- **संदर्भ :-**

1) मुळे रा. श. उमाठे, वि. तू. (1987) शक्ष□णिक संशोधनाची मूलतत्वे (द्वितीय) नागपुर, महवष्ट्र, विध्यपीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
2) पंडित बन्सी बिहारी (सप्टे 1997) शक्ष□णिक संशोधन नित्य नूतन प्रकाशन पुणे.
3) दळवी म. य. अनु. " वाचनाच्या वाटा " औरंगाबाद परीमल प्रकाशन.
4) आदर्श मराठी शब्दकोश, (1982) प्रकाशन विदर्भ मराठा बुक प्रकाशक अ. ज. प्रभू (द्वितीय आवृत्ती)
5) भिंताडे वी.रा. ( जून 2004) " शक्ष□णिक संशोधनाची पद्धती " पुणे नूतन प्रकाशक